चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
०७ सप्टेंबर, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7447744100 (PRO)

# गणेश उत्सवाच्या पार्श्वभुमिवर पोलीसांची प्रभावी प्रतिबंधक कार्यवाही

गणेश उत्सव अंतीम टप्प्यात येउन पोहचला आहे. गणेश विसर्जन शांततेत व आनंदात पार पाडण्यासाठी पोलीस विभागाकडुन बंदोबस्तांची आणखी करण्याबरोबरच प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा करण्यात येत असते. गुंडप्रवृतीच्या इसमांकडुन गणेश उत्सव विसर्जन मिरवणुकी दरम्यान काही अनुचित प्रकार करून शांतता व सुव्यवस्था भंग होउ नये या करीता शहरातील चारशे अठ्ठाविस रेकॉर्डवरील इसमांवर फौजदारी प्रकिया संहिता कलम १४४(२) अन्वये गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये सहभागी होण्यास प्रतीबंध करण्यात आला आहे. जिल्हयातील पोलीस स्टेशन नागभिड अंतर्गत महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे ६ इसमांना हद्दपार करण्यात आले आहे.

तसेच विसर्जन मिरवणुकी दरम्यान जिल्हयतील एकुण ४२८ इमसमांवर विविध कलमांतर्गत प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. त्यामध्ये चंद्रपुर शहर उप विभागाअंर्तगत ५७ इसमांवर, राजुरा उपविभागामध्ये ७१ इसमांवर, वरोरा उपविभागामध्ये १०८ इसमांवर, ब्रम्हपुरी उपविभागामध्ये १०३ इसमांवर, चिमुर उपविभागामध्ये ९ इसमांवर, मुल उपविभागामध्ये ७१ इसमांवर, गडचांदुर उपविभागामध्ये ९ इसमांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. या आदेशाचे उल्लघंन करतांना मिळुन आल्यास त्या इसमांवर कलम १८८ भा.द.वी. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. महेश्वर रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे नेतृत्वात ठाणे प्रभारी अधिकारी आणि कर्मचारी यांनी पार पाडली.

---

# गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान वाहतुकीकरीता अधिसुचना

चंद्रपूर शहरामध्ये दिनांक १२/०९/२०१९ रोजी सार्वजनिक गणेशोत्सवाचे विसर्जनाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात येणार असुन शहरातील रहदारीला अडथळा होवुन जनतेला त्रास होवू नये तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणुन पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांनी शहरातील रहदारीचा मार्ग दिनांक १२/०९/१९ चे सकाळी ०६:०० वाजता पासुन ते दिनांक १३/०९/२०१९ चे पहाटे ०६:०० वाजेपर्यतच्या कालावधीसाठी सर्व प्रकारच्या वाहनांची रहदारी खालील प्रमाणे वळविण्याचे निर्देशीत करीत आहे.

१. **गणेश विसर्जन मिरवणुक सोहळा पार पडे पर्यत सावरकर चौक–एसटी स्टॅड–प्रियदर्शनी चौक ते कस्तुरबा चौक मार्गे गांधी चौक तसेच पठाणपुरा गेट ते जटपुरा गेट मार्गे प्रियदर्शनी चौक ते जुना वरोरा नाका हा रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांना बंद ठेवण्यात येत आहे.**
२. **नागपूर रोडने येऊन बल्लारशा किंवा मुल कडे जाणारी सर्व प्रकारची वाहने हे प्रियदर्शनी चौक कडे जाण्यास बंदी असल्यांने सर्व प्रकारची वाहने ही वरोरा नाका– उड्डान पुल– सावरकर चौक ते बंगाली कॅम्प, मुल किंवा बल्लारशाकडे जातील.**
३. त्याचप्रमाणे **मुल किंवा बल्लारशा कडुन नागपूर कडे जाणारी** सर्व प्रकारची वाहने ही बंगाली कॅम्प–सावरकर चौक नविन उड्डाणपुल मार्गे नागपूर कडे जातील.
४. **नागपूर कडुन शहरामध्ये जाणारी वाहने** (जड वाहने वगळुन) घुटकाळा, श्री टॉकीज, पठाणपुरा परिसरात जावयाचे असल्यास जुना वरोरा नाका चौकातुन उजवीकडे वळण घेऊन रामनगर– संत केवलराम चौक– सेंट मायकल स्कुल–सवारी बंगला चौक–नगीनाबाग ते चोर खिडकी मार्गे शहरात प्रवेश करतील.
५. **चंद्रपुर शहर पोस्टे हद्दीतील रहीवाशांनी नागपुर,वणी,घुग्घुस,गडचांदुर कडे जाणाऱ्या प्रवाशांनी** रहमत नगर, नगीना बाग व इतर परीसरातुन जाण्यासाठी बिनबा गेट रहेमत नगर,दाताळा इत्यादी मार्गाचा अवलंब करावा.

६. **बल्लारशा व मुल कडुन येणारी वाहने** (जड वाहने वगळुन) शहरामध्ये जावयाचे असल्यास बसस्टॅड–एलआयसी ऑफीस–बगड खिडकी मार्गे किंवा जुनोना चौकातुन शहरामध्ये किंवा प्रसन्ना पेट्रोल पंप कडुन बाबुपेठ मार्गे शहरात फक्त अंचलेश्वर गेट पर्यत प्रवेश करता येईल.
७. गणेश विसर्जन मिरवणुक सोहळया दरम्यान खालील ठिकानी **नो–पार्किंग व नो– हॉकर्स झोन** म्हणुन घोषीत करण्यात येत आहे.
 १.जटपुरा गेट ते कस्तुरबा चौक पर्यंत
 २.जटपुरा गेट ते रामाळा तलाव पर्यंत
 ३.जटपुरा गेट ते प्रियदर्शनी चौक पर्यंत
 ४.जटपुरा गेट ते दवा बाजार चौक पर्यंत
 ५.कस्तुरबा चौक ते गांधी चौक ते जटपुरा गेट पर्यंत च
 ६.कस्तुरबा चौक ते अंचलेश्वर गेट पर्यंत
 ७.गांधी चौक ते मिलन चौक ते जोड देउळ पर्यंत
 ८. कस्तुरबा चौक ते जेल रोड चौक

**९.दस्तगीर चौक ते मिलन चौक**
**१०.मिलन चौक ते बजाज पॉलीटेक्नीक कॉलेज**
**११.हिंदी सिटी हायस्कुल ते रघुवंशी कॉम्प्लेक्स पर्यंत**
**१२.मौलाना आझाद चौक ते जयंत टॉकीज**
**१३.छोटा बाजार चौक ते पाताळेश्वर मंदीर**

उपरोक्त नमुद मार्गावर **नो—पार्किंग व नो— हॉकर्स झोन** म्हणुन घाषीत केल्याने मिरवणुक व वाहतुक मार्गावर नागरीकांनी, व्यवसायीकांनी तसेच गणेश विसर्जन भक्तांनी कोणत्याही प्रकारची वाहने पार्किंग/उभी करु नये.

मिरवणुक मार्गालगतच्या ज्या रहीवाशांना आपली वाहने पार्किंग स्थळी उभी करावयाची आहेत त्यांना महानगरपालीकेच्या पार्किंग स्थळी

१) जुबली हायस्कुलचे पटांगण २) महानगरपालीकेच्या बाजुला असलेली पार्किंग या ठिकाणी उभी करता येतील. परंतु मिरवणुक संपल्यानंतरच ती वाहने तेथुन काढता येतील.

त्याचप्रमाणे चंद्रपुर शहरात मोठया प्रमाणात साजरा होणारा गणपती विसर्जन सोहळा पाहण्यासाठी शहरातील व इतर ग्रामीण भागातुन नागरीक येत असतात. दरम्यान शहरात वाहतुक कोंडी होवु नये म्हणुन नागरीकांना खालील प्रमाणे पार्किंग झोन उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

**पार्किंग झोन खालील प्रमाणे घोषीत करण्यात आले आहे.**

१. चांदा क्लब ग्राउंड
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, वरोरा नाका
३. सेंट मायकल हायस्कुल, नगीना बाग
४. सिंधी पंचायत भवन, संत केवलराम चौका जवळ रामनगर
५. व्यायाम शाळा ग्राउंड, पठानपुरा चौक
६. डी.एड.कॉलेज ग्राउंड बाबुपेठ
७. महाकाली मंदीर ग्राउंड

ही ठिकाणे दिनांक १२/०९/२०१९ चे सकाळी ०६:०० वाजता पासुन दिनांक १३/०९/२०१९ चे सकाळी ०६:०० वाजेपर्यंत नागरीकांसाठी पार्किंग स्थळे म्हणुन घोषीत करण्यात येत आहेत. नागरीकांनी आपली वाहने शहरात न आणता वरील पार्किंग स्थळी पार्क करावीत. जनतेने विसर्जन दरम्यान वरील वाहतुक व्यवस्थेचे पालन करून शांतता व सुव्यवस्था अबाधीत राखणे कामी पोलीसांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

———————————————————————————————————

## चोरी करणारे अटट्ल गुन्हेगार गजाआड
## रामनगर पोलीसांनी केला १ लक्ष ५५ हजाराचा मुदद्देमाल जप्त

दिनांक ०३/०६/२०१९ रोजी पोलीस स्टेशन रामनगर येथे एका महिला फिर्यादी यांनी तक्रार दिली की, चंद्रपुर येथील संत जगनाडे महाराज वस्तीगृहातुन रात्रो दरम्यान ते आणि त्यांचे सहकारी झोपेत असतांना कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे मोबाईल फोन आणि पर्स मधील पैसे चोरून नेले. यावरून पोलीस स्टेशन रामनगर येथे अप.क्र. ९८५/२०१९ कलम ३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरचा गुन्हा दाखल होताच पोलीसांनी आरोपीचा शोध घेण्यास सुरूवात केली. तपासादरम्यान पोलीसांनी गोपनीय माहितीवरून दोन इसमांना ताब्यात घेतले. दोन्ही इसमांना विचारपुस करून चौकशी केली असता त्यांनी कबुली दिली की, दिनांक ०३/०६/२०१९ रोजी त्यांनीच चंद्रपुर येथील वस्तीगृहात चोरी केली होती आणि त्यामध्ये त्यांनी ८ मोबाईल फोन आणि ५ पर्स चोरून नेले होते. यावरून ताब्यात घेतलेले आरोपी नामे **१)** प्रकाश उर्फ माकु माखन हलदर, वय २२, **२)** राजेश प्रमोद पंजा वय २५ दोन्ही रा. शाम नगर बंगाली कॅम्प चंद्रपुर यांना अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीतांची इतर गुन्हयाबाबत आणखी कसुन चौकशी केली असता त्यांनी या गुन्हयाव्यतीरिक्त इतर ४ गुन्हयाची कबुली दिल्याने आरोपीतांकडुन सोने चांदीचे दागीने आणि इतर साहित्य असा एकुण ०५ गुन्हयात १,५५,०००/—रू. चा मुदद्देमाल हस्तगत करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. महेश्वर रेडड्ी, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपुर श्री. शिलवंत नांदेडकर यांच्या मार्गदर्शनात, पोलीस स्टेशन रामनगर प्रभारी पोनि. श्री. हाके यांचे नेतृत्वात, गुन्हे शोध पथकातील सपोनि. संतोष दरेकर यांचे सह सफौ. प्रभुदास माहुलीकर, पोहवा. आनंद परचाके, रजनीकांत पुठठ्ावार, पोना. सुधिर पाटील, शंकर येरमे, पोशि. निलेश मुडे, माजीद पठाण, मपोशि. भावना रामटेके यांनी पार पाडली.

———————————————————————————————